# यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे
(महाराष्ट्र शासनाची अंगीकृत संस्था)

## Yashwantrao Chavan Academy of Development Administration
(A Government of Maharashtra Organisation)


यशदा®

दिनांक : ३/०४/२०१७

ISO 9001-2008

प्रति,

मा. विभागीय आयुक्त,
कोकण / पुणे / नाशिक/ अमरावती/ औरंगाबाद /नागपूर

विषय : एकत्रित परिवीक्षाधिन प्रशिक्षण कार्यक्रम- २
संदर्भ : संकीर्ण- २०१६/प्र.क्र.१३५/ई-२ महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई. दिनांक ३०/०३/२०१७.

महोदय,

एकत्रित परिवीक्षाधिन प्रशिक्षण कार्यक्रम-२ (CPTP-II) अंतर्गत परिवीक्षाधिन उपजिल्हाधिकारी / तहसीलदार यांचे खातेनिहाय संलग्न प्रशिक्षण, जिल्हास्तरीय प्रशिक्षण व स्वतंत्र कार्यभार या ६६ आठवड्यांचे प्रशिक्षण दिनांक ०१/०५/२०१५ पासून सुरु करण्यात आले आहे. प्रशिक्षणाच्या शेवटच्या टप्प्यात सर्व परिवीक्षाधीन अधिका-यांची ४० गुणांची अनिवार्य लेखी परीक्षा जिल्हास्तरीय ६६ आठवडयांच्या प्रशिक्षणाच्या अनुषंगाने विभागाने आयोजित करणे आवश्यक होते परंतु विभागीय स्तरावर सदर परिक्षेचे आयोजन विहीत मुदतीत न झाल्यामुळे व परिविक्षाधीन अधिका-यांचे पुनर्विलोकन व उजळणी टप्प्यानंतर गुणपत्रक तयार करुन ते सामान्य प्रशासन विभागास सादर करणे क्रमप्राप्त असल्यामुळे उपरोक्त संदर्भीय पत्रात सुचित केल्यानूसार सदर परिक्षेचे नियोजन यशदामध्ये विभागातर्फे करण्यात येत आहे.

संदर्भाधीन पत्रानुसार व महसुल विभागाच्या निर्देशानुसार एकत्रित परिवीक्षाधिन प्रशिक्षण कार्यक्रम-२ (CPTP-II) अंतर्गत परिवीक्षाधिन उपजिल्हाधिकारी/ तहसीलदार यांची विभाग स्तरावरील अनिवार्य लेखी परीक्षा दिनांक ०८ एप्रिल २०१७ रोजी यशदा पुणे येथे महसुल विभागातर्फे दुपारी ठीक दोन वाजता आयोजित करण्यात आली आहे.

तरी कृपया एकत्रित परिवीक्षाधिन प्रशिक्षण कार्यक्रम-२ अंतर्गत प्रशिक्षण घेणा-या उपजिल्हाधिकारी(३८) व तहसिलदार(३१) यांना दिनांक ०८ एप्रिल २०१७ रोजी यशदा पुणे येथे दुपारी १२ वाजेपर्यंत उपस्थित राहण्याच्या अनुषंगाने कार्यमुक्त करण्यात यावे ही विनंती.

आपला विश्वासू,

उपमहासंचालक,
यशदा, पुणे

प्रत :
१) उपसचिव (सीपीटीपी), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
२) सहसचिव (महसूल), महसूल व वनविभाग मंत्रालय मुंबई- ३२.
३) कार्यासन अधिकारी (ई-२वई-९) महसूल व वनविभाग मंत्रालय मुंबई.



राजभवन आवार, बाणेर रस्ता, पुणे ४११ ००७. भारत (इपीएबीएक्स) : (०२०) २५६०८००० कार्यालयीन वेळेनंतर : २५६०८२७१, फॅक्स : २५६०८१००
Raj Bhavan Complex, Baner Road, Pune 411 007. India (EPABX) : (020) 25608000 After Office Hrs.: 25608271, Fax : 25608100
Email : yashada@vsnl.com I Website : www.yashada.org